पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०७ /२०२३ दि. १५/१२/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत मे. ग्यान कन्स्ट्रक्शन या कंपनी कडून प्र. क्र. २२ मधील महाजनवाडी हॉल चौक येथील रस्त्याचे UTWT पध्दतीने सिमेंट कॉक्रीटीकरणाचे काम करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) महागिरी व पोलीस स्कूल कडून जांभळीनाका व खारकर आळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पोलीस स्कूल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने पोलीस स्कूल येथून सरळ कोर्टनाका सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कोर्टनाका सर्कल कडून एन.के.टी. कॉलेज मार्गे खारकर आळी व जांभळी नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मा. जिल्हाधिकारी कार्यालय गेट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कोर्टनाका सर्कल येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) जांभळी नाका कडून खारकर आळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जांभळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जांभळी नाका येथून मुख्य बाजारपेठ मधून तसेच चिंतामणी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. १५/१२/२०२३ रोजीपासून प्र. क्र. २२ मधील महाजनवाडी हॉल चौक येथील रस्त्याचे UTWT पध्दतीने सिमेंट कॉक्रीटीकरणाचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.

CamScanner

नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :— नगर अभियंता, ठा. म. पा. ठाणे.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि ठाणेनगर वाहतूक उप विभाग.

CamScanner